**L. A. BILL No. XX OF 2026.**

A BILL

TO PROVIDE FOR PROTECTION OF RIGHT TO FREEDOM OF RELIGION AND PROHIBITION OF UNLAWFUL CONVERSION FROM ONE RELIGION TO ANOTHER RELIGION AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २०.**

**धर्मस्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी आणि एका धर्मातून दुसऱ्या धर्मात बेकायदेशीर धर्मांतर करण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** धर्मस्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी आणि एका धर्मातून दुसऱ्या धर्मात बेकायदेशीर धर्मांतर करण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्याकरिता कायदा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

एचबी ३३९०—१

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील, अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "आमिष" याचा अर्थ,—

(एक) कोणतीही भेटवस्तू देणे, इच्छापूर्ती करणे, विनाकष्ट पैसे देणे किंवा रोख किंवा वस्तूच्या स्वरुपातील भौतिक लाभ देणे; किंवा

(दोन) नोकरी देणे; किंवा

(तीन) कोणत्याही धार्मिक संस्थेद्वारे किंवा परिसंस्थेद्वारे चालवण्यात येणाऱ्या शाळेत किंवा महाविद्यालयात मोफत शिक्षण देणे; किंवा

(चार) विवाह करण्याचे वचन देणे; किंवा

(पाच) अधिक चांगली जीवनशैली, दैवी उपचार; किंवा

(सहा) एखाद्या धर्माची प्रथा, विधी व समारंभ किंवा धर्माचा कोणताही भाग, दुसऱ्या धर्माच्या तुलनेत हानिकारक पद्धतीने दर्शविणे; किंवा

(सात) एखाद्या धर्माचा दुसऱ्या धर्माच्या तुलनेत गौरव करणे,

या स्वरुपातील कोणतेही प्रलोभन दाखविणे, असा आहे;

(ख) "जबरदस्ती" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीस, कुटुंबास किंवा गटास, दैवी प्रकोप होण्याची किंवा सामाजिक बहिष्कार टाकण्याची धमकी देणे अथवा संबंधित व्यक्तींचे जीवित, अवयव किंवा मालमत्ता यास गंभीर परिणाम करण्याची धमकी देणे यासह, मानसिक दबाव टाकून किंवा शारीरिक बळाचा वापर करून शारीरिक इजा करून किंवा त्याची धमकी देऊन, त्याच्या किंवा त्यांच्या इच्छेविरुद्ध कृती करण्यास भाग पाडणे, असा आहे;

(ग) "सक्षम प्राधिकारी" याचा अर्थ, जिल्हा दंडाधिकारी किंवा शासनाने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, असा आहे;

(घ) "धर्मांतर" याचा अर्थ, स्वतःचा धर्म त्यागून आणि दुसरा धर्म स्वीकारणे, असा आहे;

(ङ) "फसवणूक" याचा अर्थ, जी सत्य नाही अशा कोणत्याही गोष्टीवर एखाद्याने विश्वास ठेवावा यासाठी प्रयत्न करणारे अप्रामाणिक वर्तन, असा आहे;

(च) "बळजबरी करणे" यामध्ये, धर्मांतरित झालेल्या किंवा धर्मांतरित होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीवर अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीवर किंवा मालमत्तेवर फौजदारी बलप्रयोग करणे किंवा कोणत्याही प्रकारची इजा करण्याची धमकी देणे, यांचा समावेश होतो ;

(छ) "लबाडीने" याचा अर्थ, खोट्या नावाने, खोट्या आडनावाने, खोट्या धार्मिक प्रतिकाद्वारे, लबाडीने क्लृप्ती करून किंवा अन्यथा वैयक्तिकरीत्या किंवा संगनमताने कृती करून कोणत्याही प्रकारची तोतयेगिरी करणे, असा आहे;

(ज) "संस्था" यामध्ये, सर्व कायदेशीर संस्था (नोंदणीकृत किंवा बिगर नोंदणीकृत), शैक्षणिक परिसंस्था, धार्मिक, सामाजिक किंवा धर्मादाय संघटना, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, रुग्णालये, व्यक्तींचा अधिसंघ, अशासकीय संघटना, आणि अशा इतर संघटना, यांचा समावेश होतो;

(झ) "सामूहिक धर्मांतर" याचा अर्थ, एकाचवेळी दोन किंवा अधिक व्यक्तींचे एका धर्मातून दुसऱ्या धर्मात धर्मांतर करणे, असा आहे;

(ञ) "अल्पवयीन " याचा अर्थ, अठरा वर्षे वयाखालील व्यक्ती, असा आहे;

(ट) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(ठ) "धर्म" यामध्ये, भारतात किंवा त्याच्या कोणत्याही भागात प्रचलित असलेली, अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा रूढीन्वये व्याख्या केलेली, उपासना पद्धती, विश्वास, श्रद्धा, उपासना किंवा जीवनशैली यांच्या कोणत्याही संघटित पद्धतीचा समावेश होतो;

(ड) "धर्मांतर करणारा" याचा अर्थ, जी व्यक्ती किंवा संस्था, एका धर्मातून दुसऱ्या धर्मात धर्मांतर करण्याची कोणतीही कृती करते ती कोणत्याही धर्माची व्यक्ती किंवा संस्था, असा आहे;

(ढ) "गैरवाजवी प्रभाव" यामध्ये, व्यक्तींमधील अस्तित्वात असणारे असे संबंध की, ज्यामध्ये, धर्मांतर करणारा दुसऱ्याच्या इच्छेवर वर्चस्व गाजवण्याच्या स्थितीत असतो आणि अशा दुसऱ्या व्यक्तीचे एका धर्मातून दुसऱ्या धर्मात धर्मांतर करण्यासाठी त्या स्थितीचा वापर करतो याचा समावेश होतो;

(ण) "बेकायदेशीर धर्मांतर" याचा अर्थ, आमिष दाखवून, जबरदस्ती करून, फसवणूक करून, बळजबरी करून, दिशाभूल करून, धमकी देऊन, गैरवाजवी प्रभाव टाकून, किंवा कोणत्याही लबाडीच्या मार्गाचा वापर करून, अथवा शिक्षणाच्या माध्यमातून बुद्धिभेद करून किंवा अशा इतर कोणत्याही मार्गाचा अवलंब करून, एखाद्या व्यक्तीचे एका धर्मातून दुसऱ्या धर्मात धर्मांतर करणे, असा आहे.

प्रकरण दोन

## बेकायदेशीर धर्मांतरास प्रतिबंध करणे

बेकायदेशीर धर्मांतरास प्रतिबंध करणे.

**३.** (१) कोणतीही व्यक्ती, स्वतः अथवा इतर व्यक्तींशी किंवा संस्थेशी संगनमताने कृती करून, अन्य कोणत्याही व्यक्तीचे एका धर्मातून दुसऱ्या धर्मात,—

(क) (एक) आमिष,

(दोन) जबरदस्ती,

(तीन) फसवणूक,

(चार) बळजबरी,

(पाच) दिशाभूल,

(सहा) धमकी,

(सात) गैरवाजवी प्रभाव, किंवा

(आठ) कोणताही लबाडीचा मार्ग,

यांचा वापर करून किंवा त्याचा अवलंब करून; किंवा

(ख) खंड (क) मध्ये नमूद केलेल्या कृतींपैकी कोणतीही कृती वापरून किंवा त्याचा अवलंब करून विधीपूर्वक विवाह करून किंवा विवाहाच्या स्वरूपातील नातेसंबंध प्रस्थापित करून किंवा विवाहाचे वचन देऊन,

एकतर प्रत्यक्षपणे किंवा अन्य प्रकारे, धर्मांतर करणार नाही किंवा धर्मांतर करण्याचा प्रयत्न करणार नाही, किंवा धर्मांतर करण्यास साहाय्य करणार नाही, किंवा अपप्रेरणा देणार नाही, किंवा मूकसंमती देणार नाही अथवा धर्मांतर करण्याच्या कटात भाग घेणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून केलेले कोणतेही धर्मांतर या अधिनियमान्वये शिक्षापात्र अपराध असेल.

(३) पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून केलेले कोणतेही धर्मांतर, शून्यवत व निरर्थक असेल.

केवळ बेकायदेशीर धर्मांतराच्या प्रयोजनासाठी केलेला विवाह शून्यवत व निरर्थक असणे.

**४.** केवळ बेकायदेशीर धर्मांतराच्या प्रयोजनासाठी विधीपूर्वक केलेला कोणताही विवाह, विवाहातील कोणत्याही पक्षकाराने दुसऱ्या पक्षकाराविरुद्ध सादर केलेल्या याचिकेवरून, न्यायालयाद्वारे शून्यवत व निरर्थक असल्याचे घोषित करण्यात येईल.

बालकाचा हक्क.

**५.** (१) बेकायदेशीर धर्मांतरामुळे झालेल्या विवाहातून किंवा विवाहाच्या स्वरुपातील नातेसंबंधातून जन्मलेले कोणतेही बालक,—

(क) अशा विवाहापूर्वी किंवा विवाहाच्या स्वरुपातील नातेसंबंधापूर्वी त्याच्या आईचा जो धर्म असेल, त्याच धर्माचे असल्याचे मानण्यात येईल;

(ख) त्याला, आई व वडील यांना लागू असलेल्या प्रचलित उत्तराधिकार कायद्यांनुसार, आईच्या व वडिलांच्या मालमत्तेमध्ये उत्तराधिकार मिळण्याचा हक्क असेल; आणि

(ग) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ याच्या कलम १४४ च्या तरतुदींनुसार निर्वाह खर्चास हक्कदार असेल. २०२३ चा ४६.

(२) न्यायालयाने अन्यथा निर्णय दिला नसेल तर, बालकाची अभिरक्षा बालकाच्या आईकडे असेल.

प्रकरण तीन

## विधिसंमत धर्मांतराची प्रक्रिया

धर्मांतराचा इरादा घोषित करणे.

**६.** (१) एका धर्मातून दुसऱ्या धर्मात धर्मांतर करण्याचा इरादा असलेली कोणतीही व्यक्ती, आणि धर्मांतर समारंभ आयोजित करण्याचा इरादा असलेली कोणतीही व्यक्ती किंवा संस्था, जेथे असे धर्मांतर आयोजित करण्याचे प्रस्तावित केलेले आहे तेथील सक्षम प्राधिकाऱ्यास, अशा प्रस्तावित धर्मांतराच्या साठ दिवस आधी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, नोटीस देईल.

(२) सक्षम प्राधिकारी, पोट-कलम (१) खालील नोटीस प्राप्त झाल्यानंतर, सक्षम प्राधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या आणि जेथे अशी व्यक्ती राहते किंवा अशा व्यक्ती राहतात तेथील ग्रामपंचायतीच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कार्यालयातील सूचना फलकावर प्रस्तावित धर्मांतराबाबत, नोटीस दिल्यापासून तीस दिवसांच्या आत, आक्षेप मागविणारी सूचना प्रसिध्द करील.

(३) जर कोणताही आक्षेप प्राप्त झाला असेल तर किंवा अन्यथा, सक्षम प्राधिकाऱ्यास, प्रस्तावित धर्मांतराचा इरादा, प्रयोजन किंवा कारण यांसंबंधात पोलिसांमार्फत चौकशी करता येईल.

(४) जर सक्षम प्राधिकारी, उक्त चौकशीनंतर, असे धर्मांतर, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करणारे आहे अशी खात्री पटली असेल तर, तो, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल फौजदारी कारवाई सुरू करण्यासाठी संबंधित पोलीस प्राधिकाऱ्यांना फर्मावील.

धर्मांतरानंतरचे घोषणापत्र.

**७.** (१) धर्मांतर केलेली व्यक्ती आणि जिने धर्मांतराचे आयोजन केले असेल ती व्यक्ती किंवा संस्था, अशा धर्मांतराच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, सक्षम प्राधिकाऱ्यास घोषणापत्र सादर करील.

(२) अशा घोषणापत्रात, आवश्यक तपशील म्हणजेच, धर्मांतरित व्यक्तीचे नाव, वय, कायमचा पत्ता, सध्याचे राहण्याचे ठिकाण, आईचे नाव, वडिलांचे नाव, पतीचे किंवा पत्नीचे नाव, धर्मांतरित व्यक्ती मूळ ज्या धर्माची होती तो धर्म आणि तिने ज्या धर्मात धर्मांतर केले आहे तो धर्म, धर्मांतराचा दिनांक व ठिकाण, आणि धर्मांतरासाठी पार पाडलेल्या प्रक्रियेचे स्वरूप, इत्यादींसारखा तपशील अंतर्भूत असेल.

(३) सक्षम प्राधिकारी, अशा व्यक्तीने किंवा संस्थेने केलेल्या घोषणापत्राच्या तथ्याची नोंद करील.

(४) जर अशा व्यक्तीने किंवा संस्थेने, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा धर्मांतराचे घोषणापत्र सादर करण्यास कसूर केली तर, असे धर्मांतर शून्यवत व निरर्थक असेल.

प्रकरण चार

## अपराध व शिक्षा

तक्रार दाखल करण्यास सक्षम असणारी व्यक्ती.

**८.** (१) धर्मांतरित व्यक्ती, अशा व्यक्तीचे आई-वडील, भाऊ किंवा बहीण अथवा जिचे अशा व्यक्तीशी रक्ताचे, वैवाहिक किंवा दत्तक नाते असेल अशी इतर कोणतीही व्यक्ती, अशा बेकायदेशीर धर्मांतराविरुद्ध पोलिसांकडे प्रथम माहिती अहवाल दाखल करू शकेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीने केलेली तक्रार नोंदवून घेणे पोलीस ठाण्याच्या अंमलदार पोलीस अधिकाऱ्यासाठी अनिवार्य असेल.

(३) जर, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून धर्मांतर केले आहे किंवा केले जात आहे अशी पोलीस अधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, तो, स्वाधिकारे, अशा उल्लंघनाची दखल घेईल.

अपराध व शिक्षा.

**९.** (१) जो कोणी, कलम ३ च्या तरतुदींचे उल्लंघन करील, त्यास, सात वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो, एक लाख रुपये इतक्या द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

(२) जो कोणी, अज्ञान व्यक्तीच्या किंवा मनोविकल व्यक्तीच्या किंवा महिलेच्या अथवा अनुसूचित जातीतील किंवा अनुसूचित जमातीतील व्यक्तीच्या बाबतीत, कलम ३ च्या तरतुदींचे उल्लंघन करील, त्यास, सात वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो, पाच लाख रुपये इतक्या द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

(३) जो कोणी, सामूहिक धर्मांतराच्या बाबतीत, कलम ३ च्या तरतुदींचे उल्लंघन करील, त्यास, सात वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो, पाच लाख रुपये इतक्या द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

(४) या अधिनियमाखालील अपराधाबद्दल यापूर्वी दोषसिद्ध ठरविण्यात आलेले असताना, जी कोणी व्यक्ती किंवा संस्था, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध पुन्हा करील, अशा व्यक्तीला किंवा संस्थेला, दहा वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि ती, सात लाख रुपये इतक्या द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

संस्थेसाठी शास्ती.

**१०.** (१) जर कोणतीही संस्था किंवा संघटना, या अधिनियमाच्या तरतुदींचा भंग करील तर, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये असलेली अशा संघटनेची किंवा संस्थेची नोंदणी, तसे करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याकडून रद्द करण्यात येईल आणि त्या संघटनेचा, किंवा यथास्थिति, संस्थेचा कारभार पहात असलेल्या प्रभारी व्यक्तीस किंवा व्यक्तींना, सात वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि त्या, पाच लाख रुपये इतक्या द्रव्यदंडास देखील पात्र असतील.

(२) राज्य शासन, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या अशा संघटनेस किंवा संस्थेस, कोणतेही वित्तीय साहाय्य किंवा अनुदान देणार नाही.

अपराधातील व्यक्ती.

**११.** जर या अधिनियमाखालील अपराध केलेला असेल तर, पुढीलपैकी प्रत्येक व्यक्तीने असा अपराध करण्यामध्ये भाग घेतला असल्याचे मानण्यात येईल आणि ती व्यक्ती, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि जणू काही तिने उक्त अपराध प्रत्यक्षपणे केलेला आहे असे समजून तिच्यावर दोषारोप ठेवण्यात येईल :—

(एक) ज्या कृत्यामुळे अपराध घडतो ते कृत्य प्रत्यक्षात जी व्यक्ती करते अशी प्रत्येक व्यक्ती;

(दोन) जी व्यक्ती, अपराध करण्यासाठी साहाय्यभूत होण्याच्या किंवा दुसऱ्या व्यक्तीस मदत करण्याच्या प्रयोजनासाठी कोणतेही कृत्य करते किंवा ते करण्याचे टाळते अशी प्रत्येक व्यक्ती;

(तीन) जी व्यक्ती, अपराध करण्यामध्ये इतर व्यक्तीस मदत करते किंवा अपप्रेरणा देते अशी प्रत्येक व्यक्ती;

(चार) जी व्यक्ती, अपराध करण्यासाठी इतर कोणत्याही व्यक्तीस सल्ला देते, तिचे मन वळविते किंवा तिला प्रवृत्त करते अशी कोणतीही व्यक्ती.

बेकायदेशीर धर्मांतराचे दस्तऐवज पृष्ठांकित करणारी व्यक्ती.

**१२.** जी व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून, धर्मांतराच्या संबंधातील कोणताही दस्तऐवज निष्पादित करते किंवा ते पृष्ठांकित करते किंवा साक्षांकित करते अशी कोणतीही व्यक्ती, अपराध करण्यास अपप्रेरणा देत असल्याचे किंवा साहाय्य करीत असल्याचे मानण्यात येईल आणि ती व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये शिक्षेस पात्र असेल.

सिद्ध करण्याची जबाबदारी.

**१३.** या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून धर्मांतर करण्यात आलेले नव्हते हे सिद्ध करण्याची जबाबदारी, जिने असे धर्मांतर करविले त्या व्यक्तीवर आणि ज्याने अशा धर्मांतरास साहाय्य केले, मदत केली किंवा अपप्रेरणा दिली त्या अपप्रेरकावर असेल.

अन्वेषण करण्याचा अधिकार.

**१४.** या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याही अपराधाचे अन्वेषण, पोलीस उपनिरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

अपराध दखलपात्र व अजामीनपात्र असणे.

**१५.** (१) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला प्रत्येक अपराध, दखलपात्र व अजामीनपात्र असेल. २०२३ चा ४६.

(२) या अधिनियमाखालील सर्व अपराध, सत्र न्यायालयाद्वारे न्यायचौकशी करण्यायोग्य असतील.

## प्रकरण पाच

## **संकीर्ण**

बेकायदेशीर धर्मांतरास बळी पडलेल्या व्यक्तींना संरक्षण.

**१६.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून, केलेल्या धर्मांतरास बळी पडलेल्या व्यक्ती, निर्वाह खर्च आणि बालकांची अभिरक्षा मिळण्यास हक्कदार असतील.

(२) राज्य शासन, बेकायदेशीर धर्मांतरास बळी पडलेल्या व्यक्तींना, विहित करण्यात येईल असे पुनर्वसन साहाय्य देईल.

नियम करण्याचा अधिकार.

**१७.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, सत्रासीन असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने मांडण्यात

आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, असा निर्णय **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करणे.

**१८.** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक व इष्ट असल्याचे दिसून येईल त्याप्रमाणे, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील, अशा तरतुदी, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येतील किंवा असे निदेश देता येतील:

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, या पोट-कलमान्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो, काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

भारताच्या संविधानान्वये हमी दिलेला धर्मस्वातंत्र्याचा हक्क हा, निरपवाद नाही तर, तो सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांशी संबंधित असणाऱ्या संविधानाच्या भाग तीनच्या अन्य तरतुदी यांस अधीन आहे. भारतीय सर्वोच्च न्यायालयाने, अनेक प्रकरणांमध्ये असे निर्णय दिलेले आहेत की, धर्म स्वातंत्र्य हे वाजवी निर्बंधांच्या अधीन आहे आणि संविधानाच्या अनुच्छेद २५ खालील धर्म प्रसाराच्या हक्कामध्ये, दुसऱ्या व्यक्तीचे बळजबरीने धर्मांतर करण्याच्या हक्काचा समावेश होत नाही.

२. बळजबरीने, अनिच्छेने किंवा नागरिकांच्या मुक्त संमतीवर प्रभाव टाकून केल्या जाणाऱ्या धर्मांतराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे आणि विविध संस्थांद्वारे त्या घटना संघटित रीतीने घडवून आणल्या जात आहेत. सामूहिक धर्मांतराच्या अनेक घटना उघडकीस आल्या असून, त्यामध्ये भोळ्याभाबड्या व्यक्तींना, कोणतीही भेटवस्तू देऊन, इच्छापूर्ती करून, विनाकष्ट पैसे देऊन अथवा एकतर रोख किंवा वस्तूच्या स्वरुपातील भौतिक लाभ देऊन, नोकरी देऊन, कोणत्याही धार्मिक संस्थेद्वारे किंवा परिसंस्थेद्वारे चालवण्यात येणाऱ्या शाळेत किंवा महाविद्यालयात मोफत शिक्षण देऊन, विवाह करण्याचे वचन देऊन, अधिक चांगली जीवनशैली पुरवून, दैवी उपचाराने बरे करून इ. त्यांचे एका धर्मातून दुसऱ्या धर्मात बळजबरीने धर्मांतर करण्यात आलेले आहे. या घटनांमुळे, राज्यातील सार्वजनिक सुव्यवस्थेस अडथळा निर्माण होत आहे आणि सामाजिक सलोखा बिघडत आहे.

व्यक्ती किंवा कुटुंबे, त्यांच्या, समाजातील सामाजिक व आर्थिक दुर्बलतेमुळे बेकायदेशीर धर्मांतरास सहजपणे बळी पडतात. समाजातील अशा दुर्बल घटकांना, राज्याकडून संरक्षण मिळणे गरजेचे आहे. अशा धर्मांतरांतून उद्भवणारे विविध प्रश्न हाताळण्यासाठी विद्यमान कायदे पुरेसे नाहीत.

३. अशा धर्मांतराचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात कोणताही कायदा नाही. ओडिसा, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, गुजरात, अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, उत्तराखंड, तामिळनाडू, यांसारख्या विविध राज्यांनी एका धर्मातून दुसऱ्या धर्मात असे बळजबरीने व बेकायदेशीरपणे धर्मांतर करण्यास प्रतिबंध करण्यासाठी अगोदरच धर्म स्वातंत्र्य अधिनियम केलेले आहेत.

म्हणून, महाराष्ट्र शासनाने, धर्मांतराशी संबंधित असणाऱ्या कायदेशीर प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी पोलीस महासंचालकाचा आणि शासनाच्या संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेली विशेष समिती घटित केली होती. उक्त समितीने, इतर राज्यांतील विविध तत्सम कायद्यांचा यथोचित विचारविमर्श व विचार केल्यानंतर, महाराष्ट्र राज्याकरिता महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य अधिनियम करण्याची शिफारस केली आहे.

म्हणून, धर्म स्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी आणि बेकायदेशीर धर्मांतरासं प्रतिबंध करण्यासाठी कायदा करणे, इष्ट आहे, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

४. प्रस्तावित कायद्याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(क) आमिष दाखवून, दिशाभूल करून, बळजबरी करून, गैरवाजवी प्रभाव टाकून, जबरदस्ती करून किंवा कोणत्याही लबाडीच्या मार्गाचा, इत्यादी वापर करून किंवा अवलंब करून केल्या जाणाऱ्या धर्मांतरास प्रतिबंध करणे;

(ख) सक्षम प्राधिकाऱ्यास पूर्व- नोटीस देऊन धर्मांतराचा इरादा घोषित करण्यासह, धर्मांतराच्या प्रक्रियेची तरतूद करणे;

(ग) धर्मांतरित व्यक्तीने आणि अशा धर्मांतराचे आयोजन केलेल्या व्यक्तीने किंवा संस्थेने सक्षम प्राधिकाऱ्यास घोषणापत्र सादर करण्याची तरतूद करणे;

(घ) प्रस्तावित कायद्याच्या तरतुदींच्या उल्लंघनाच्या अपराधांची व शिक्षेची तरतूद करणे;

(ङ) पोलीस उप निरीक्षकापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याकडून बेकायदेशीर धर्मांतराचे अन्वेषण करण्याची तरतूद करणे;

(च) या अधिनियमाखालील अपराध दखलपात्र व अजामीनपात्र असतील अशी तरतूद करणे;

(छ) बेकायदेशीर धर्मांतरास बळी पडलेल्या व्यक्तींना राज्य शासनाद्वारे पुनर्वसन सहाय्याची, निर्वाह खर्च देण्याची व बालकांची अभिरक्षा मिळण्याची तरतूद करणे.

**५.** वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १२ मार्च, २०२६.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १(२).**—या खंडान्वये, ज्या दिनांकास हा अधिनियम अंमलात येईल तो दिनांक, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ६(१).**—या खंडान्वये, धर्मांतरापूर्वी, सक्षम प्राधिकाऱ्यास नोटीस देण्याचा नमुना व रीत नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ७(१).**—या खंडान्वये, धर्मांतरानंतरचे घोषणापत्र सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करण्याचा नमुना व रीत नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १६(२).**—या खंडान्वये, अवैध धर्मांतरास बळी पडलेल्या व्यक्तीस देण्याचे, पुनर्वसन साहाय्य नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १७(१).**—या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १८(१).**—या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, ती दूर करण्यासाठी, **शासकीय राजपत्रात** आदेश काढण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

(शा.म.मु.) एचबी ३३९०–३ (४४०—३-२०२६)

## वित्तीय ज्ञापन

या विधेयकाच्या खंड १६ च्या उप-खंड ( २ ) मध्ये, बेकायदेशीर धर्मांतरास बळी पडलेल्या व्यक्तींसाठी, विहित करण्यात येईल अशा पुनर्वसन सहाय्याची तरतूद केली आहे.

हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, त्यामध्ये, बेकायदेशीर धर्मांतरास बळी पडलेल्या व्यक्तींना पुनर्वसन सहाय्य देण्याकरिता राज्याच्या एकत्रित निधीतून करावायाच्या आवर्ती खर्चाचा अंतर्भाव असेल. तथापि, याबाबतीत जो खर्च करावा लागू शकेल त्या प्रत्यक्ष आवर्ती खर्चाचा अंदाज देणे या टप्प्यावर शक्य होणार नाही.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (३) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६ विचारात घेण्याबाबत राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना शिफारस करीत आहेत.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २०. ]**

**[ धर्मस्वातंत्र्याच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी आणि एका धर्मातून दुसऱ्या धर्मात बेकायदेशीर धर्मांतर करण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्याकरिता विधेयक. ]**

**[ श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.]

**[ विधानसभेने दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव -१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.